# आयसीटी पर्यंत  प्रवेशक्षमता प्राप्तीचे धोरण स्वीकारण्यासाठी मार्गदर्शक

# स्मार्ट सिटीज  सर्वांसाठी

Smart Cities for All

## श्रेयनिर्देश

या साधनाचा विकास तज्ञांच्या इनपुटशिवाय शक्य झाला नसता ज्यांनी सक्रियपणे जगभरात आयसीटी पर्यंत अधिक चांगल्या प्रवेशक्षमतेचा प्रसार करून तो लागू करत आहेत.
खालील समालोचकांचा त्यांच्या मौल्यवान योगदानासाठी कृतज्ञतापूर्वक उल्लेख करीत आहोत:

**गुनेला ॲस्टब्रिंक**, प्रमुख, जीएसए इन्फोकॉम
**निकोल बॉन**, संचालक, महापौरांचे अपंगत्व कार्यालय, सॅन फ्रान्सिस्को
**डेविड एम. कापोझ्झी**, कार्यकारी संचालक, यू.एस. प्रवेश मंडळ
**अर्फराज खंबाटा**, उपसंचालक, महापौरांचे अपंगत्व कार्यालय, सॅन फ्रान्सिस्को
**लॉरा रुबी**, संचालक, जागतिक प्रवेशक्षमता धोरण आणि मानके, मायक्रोसॉफ्ट कॉर्पोरेशन
**हाजिमे यमाडा**, मंडळाचे अध्यक्ष, माहिती संवाद धोरण मंच, जपान
**रेनाटा झानेट्टी**

# 1

# कार्यकारी सारांश

जगभरातील स्मार्ट सिटीज अपंगत्व असलेल्या व्यक्ती आणि वृद्ध व्यक्तींचे हक्क पुढे नेण्यासाठी व त्यांच्या डिजिटल समावेशासाठी, माहिती आणि संवाद तंत्रज्ञानासह (आयसीटी) त्यांच्या खरेदीच्या लक्षणीय सामर्थ्याचा वापर करण्यासाठी अद्वितीय स्थितीत आहेत.  सरकारी किंवा सरकारने निधी पुरविलेल्या कार्यक्रमांद्वारे खरेदी केलेले (आयसीटी) उपकरण, सॉफ्टवेअर, अनुप्रयोग आणि सेवा यांच्यापर्यंत प्रवेशक्षमतेचा प्रसार करण्यासाठी सार्वजनिक प्राप्ती प्रक्रियांना वाढत्या प्रमाणात एक अत्यंत परिणामकारक धोरण साधन म्हणून ओळखले जात आहे.  सार्वजनिक प्राप्तीच्या सकारात्मक परिणामामधील जागतिक स्वारस्य हे मुख्यत्वेकरून दोन सुप्रसिद्ध प्रवेशक्षमता सार्वजनिक धोरण उपक्रमांची निष्पत्ती आहे; यूनायटेड स्टेट्स मधील पुनर्वसन कायद्याच्या कलम 508 (फेडरल सरकारची इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञानाची खरेदी, विकास, देखरेख आणि वापर प्रशासित करणारा)
आणि ETSI EN 301 549 (यूरोपियन प्रवेशक्षमता मानक ज्यामध्ये यूरोपमध्ये सार्वजनिक प्राप्तीसाठी आयसीटी उत्पादने आणि सेवांपर्यंत प्रवेशक्षमतेचे निकष समाविष्ट आहेत). प्रवेश करण्यासारख्या स्मार्ट सिटीज निर्माण करण्यासाठी आयसीटी च्या सर्व सार्वजनिक प्राप्तीच्या भागाची रचना करण्यासाठी प्रवेशक्षमतेची आवश्यकता असल्याचे जगभरातील तज्ञ मान्य करतात. प्रवेश करण्यायोग्य आयसीटी उत्पादने आणि सेवांच्या सार्वजनिक प्राप्तीसाठी, स्मार्ट सिटीज कार्यक्रम हे अस्तित्वात असलेल्या मॉडेल धोरणाचा आणि सर्वोत्तम पद्धतींचा फायदा उचलू शकतात.

> *स्मार्ट सिटीज परिषद स्मार्ट सिटीची व्याख्या अशी करते जी "माहिती आणि संवाद तंत्रज्ञानाचा वापर त्यांचे जगणे, काम करणे आणि दीर्घकालीन क्षमता वाढविण्यासाठी करते."*



# उद्दिष्ट्ये



या मार्गदर्शकाचे उद्दिष्ट शहरांना एक धोरण स्वीकारण्यात मदत करणे आहे ज्यामध्ये अपंगत्व असलेल्या व्यक्तींना आणि वृद्ध व्यक्तींना कोणत्याही आयसीटी खरेदींपर्यंत प्रवेश करून देणे आवश्यक असते. आयसीटी प्रवेशक्षमता धोरणांचा स्वीकार केल्यामुळे शहरातील उद्योग आणि पुरवठादारांना देखील या भागातील शहरांची स्पष्ट दिशा कळविण्याचा फायदा होऊ शकतो. शहरांकडून तंत्रज्ञानाची प्राप्ती करण्याशी संबंधित विविध भूमिकांमधील लोकांना साहाय्य करण्याचा या मार्गदर्शकाचा हेतू आहे. ते स्मार्ट सिटीज मधील तंत्रज्ञान पुरवठादार, प्रवेशक्षमता तज्ञ, स्मार्ट सिटी व्यवस्थापक, धोरणकर्ते, स्मार्ट सिटी ॲप्स आणि उपाय डिझाइन करणारे विकसक, स्मार्ट सिटीजवर संशोधन करणारे अभ्यासक आणि अपंगत्व संस्था आणि स्मार्ट सिटीजना अधिक समावेशक बनविण्यासाठी काम करणारे अधिवक्ते यांच्यासाठी देखील स्वारस्याचे असेल.

हा दस्तऐवज सर्वांसाठी स्मार्ट सिटीजना पूरक असा बनविलेला आहे: प्राधान्य आयसीटी प्रवेशक्षमता मानके लागू करण्याचा मार्गदर्शक दस्तऐवज, जो महत्त्वाच्या आयसीटी प्रवेशक्षमता निकषाच्या प्राधान्य मानकांच्या संपूर्ण यादीची ओळख करून व्याख्या करतो.

त्यांच्या शहरांमध्ये आयसीटी प्रवेशक्षमता सुधारण्यासाठी मानके आणि धोरणे कशी लागू करायची याबद्दलची समज वाढविण्यासाठी, यांतील प्रत्येक दस्तऐवज स्वतंत्रपणे किंवा एकत्र वापरता येऊ शकतो.

> *यूनायटेड नेशन्सच्या अंदाजानुसार, जगभरातील लोकसंख्येच्या 15% किंवा सुमारे 1 अब्ज लोक एक किंवा अनेक अपंगत्व स्थितीसह जगत आहेत. याशिवाय, 46 टक्क्यांहून जास्त वृद्ध व्यक्तींचे - जे 60 वर्षे किंवा जास्त वयाचे आहेत - त्यांना अपंगत्व आहे आणि 250 दशलक्षांहून अधिक वृद्ध व्यक्तींचोंना मध्यम ते तीव्र अपंगत्वाचा अनुभव आहे.*

# सर्व प्रकल्पांसाठी स्मार्ट सिटीजचा आढावा



2016 च्या जूनमध्ये G3ict आणि वर्ल्ड एनेबल्ड यांनी, जगभरातील स्मार्ट सिटीज मधील सध्याच्या आयसीटी प्रवेशक्षमता आणि अपंगत्व असलेल्या लोकांचा आणि वृद्ध व्यक्तींचा डिजिटल समावेश यांच्या स्थितीबद्दल सांगण्यासाठी आंतर्राष्ट्रीय उपक्रम सुरू केला. या उपक्रमात 250 आंतर्राष्ट्रीय तज्ञांच्या सर्वेक्षणाचा समावेश होता ज्यामध्ये शहरातील सरकार, उद्योग, समाज आणि शैक्षणिक विभागातील तज्ञ होते, जागतिक स्मार्ट सिटीज (क्यूटो, बार्सेलोना, लंडन, सॅन फ्रान्सिस्को आणि न्यूयॉर्क) बद्दल चर्चांच्या अनेक फेऱ्या झाल्या आणि स्मार्ट सिटी कार्यक्रम व्यवस्थापक आणि तंत्रज्ञांच्या एकापाठोपाठ एक मुलाखती झाल्या.  या उपक्रमाने ही पुष्टी केली की आजच्या स्मार्ट सिटीज या पूर्णपणे प्रवेश करण्यायोग्य नाहीत आणि त्यामुळे अपंगत्व असलेल्या लोकांसाठी डिजिटल विभाजन वाढत आहे.

2016 मध्ये सर्व प्रकल्पांसाठी स्मार्ट सिटीजचे सर्वेक्षण केलेल्या 60% जागतिक तज्ञांनी मान्य केले की सध्याच्या स्मार्ट सिटीज अपंगत्व असलेल्या व्यक्तींसाठी अपयशी ठरत आहेत. यामुळे, स्वतंत्रपणे जगणे, दळणवळण, ई-सरकार, रोजगार, सामाजिक सहभाग, सुरक्षितता आणि न्याय, आपत्कालीन प्रतिसाद, मत देणे आणि निवडणुका आणि आर्थिक सेवा यांसह अनेक मोठ्या भागांवर नकारात्मक परिणाम होत आहेत. जागतिक तज्ञांना सध्या आयसीटी प्रवेशक्षमता मानके आणि स्मार्ट सिटीज कार्यक्रम यांच्यादरम्यान कोणताही स्पष्ट दुवा दिसला नाही. सर्वेक्षण केलेल्यांपैकी फक्त 18% जागतिक तज्ञांना आयसीटी प्रवेशक्षमता मानके वापरणाऱ्या स्मार्ट सिटीज माहीत आहेत. पुढे असे की, जगभरातील तज्ञांचा असा स्पष्ट विश्वास आहे की खऱ्या प्रवेशयोग्य स्मार्ट सिटीज बनविण्यासाठी, आयसीटी च्या सर्व सार्वजनिक प्राप्तींमध्ये प्रवेशक्षमतेच्या गरजा हा आवश्यक निकष असायला पाहिजे.

## प्रवेशक्षमता तंत्रज्ञान म्हणजे काय?



प्रवेशक्षमतेची, ढोबळमानाने ISO TC 159 मध्ये अशी व्याख्या केली आहे: “लोकसंख्येतील सर्वात विस्तृत वैशिष्ठ्ये आणि क्षमता असणाऱ्या लोकांना विशिष्ट वापराच्या दृष्टिकोनातून विशिष्ट ध्येय साध्य करण्यासाठी उत्पादने, सिस्टिम्स, सेवा, वातावरण आणि सुविधा वापरता येऊ शकण्याची कमाल मर्यादा.”

जेव्हा आयसीटी चा मुद्दा येतो तेव्हा विशेषकरून, प्रवेशाच्या क्षमतेचा सर्वसाधारणपणे मुख्य प्रवाहातील तंत्रज्ञानाची गुणवत्ता असा स्वीकार केला जातो जसे की कॉम्प्युटर, मोबाइल फोन, स्वयं-सेवा किओस्क किंवा सॉफ्टवेअरचा भाग जो शक्य तितक्या विस्तृत श्रेणीच्या वापरकर्त्यांद्वारे वापरण्यात येते, त्यांच्या क्षमता किंवा अपंगत्व यांना विचारात न घेता.

प्रवेशक्षमता कोणालाही साधन पाहणे, ऐकणे आणि वापरणे सोपे बनविते आणि त्यांच्या डिजिटल वातावरणाला त्यांच्या स्वत:ची प्राधान्ये, गरजा आणि क्षमतांच्या नुसार अनुकूल करू देते. अनेक लोकांसाठी, प्रवेशाची क्षमता म्हणजे स्मार्ट सिटीचे कार्यक्रम आणि डिजिटल सेवांपर्यंत प्रवेश करणे शक्य करते.

## सार्वजनिक प्राप्ती म्हणजे काय?



सार्वजनिक प्राप्ती म्हणजे खाजगी क्षेत्रातील कंत्राटदार आणि विक्रेते यांच्याकडून वस्तू आणि सेवा एका पारदर्शक आणि स्पर्धात्मक बोलीच्या प्रक्रियेने खरेदी करणे यासंबंधित असते. वस्तू, सेवा आणि पायाभूत सुविधांचा विकास यांची खरेदी कशी करावी याच्या अपेक्षा, निकष आणि मर्यादा सार्वजनिक प्राप्ती धोरणे सेट करतात.

### सार्वजनिक प्राप्ती

“... म्हणजे प्रक्रिया ज्यांच्या मार्फत सार्वजनिक अधिकारी जसे की सरकारी विभाग किंवा स्थानिक अधिकारी, काम, वस्तू किंवा सेवा कंपन्यांकडून विकत घेतात" (यूरोपियन कमिशन)

“... म्हणजे सार्वजनिक अधिकाऱ्यांमार्फत वस्तू आणि सेवा खरेदी करण्यासाठी कंत्राटे बहाल करण्याची प्रक्रिया" (CENELEC)

“... म्हणजे सरकार आणि राज्याच्या मालकीच्या संस्थांमार्फत वस्तू, सेवा आणि कामांची खरेदी" (OECD)



## आयसीटी प्रवेशक्षमतेच्या सार्वजनिक प्राप्तीची धोरणे काय आहेत?



सरकारी किंवा सरकारने निधी पुरविलेल्या कार्यक्रमांद्वारे खरेदी केलेले आयसीटी उपकरण, सॉफ्टवेअर, अनुप्रयोग आणि सेवा यांच्यापर्यंत प्रवेशाचा प्रसार करण्यासाठी सार्वजनिक प्राप्ती प्रक्रियांनी एक अत्यंत परिणामकारक धोरण साधन म्हणून मोठ्या प्रमाणात लक्ष वेधले आहे. आयसीटी गोपनीयता आणि सुरक्षितता यांचा प्रसार करण्यासाठी त्यांना प्राप्तीचा एक भाग म्हणून सहभागी करणे ही आज सरकारसाठी एक सामान्य पद्धत झाली आहे. आयसीटी प्रवेशक्षमता त्याच मार्गाने जोडता येऊ शकते. सार्वजनिक प्राप्तीच्या सकारात्मक परिणामामधील जागतिक स्वारस्य हे मुख्यत्वेकरून दोन सुप्रसिद्ध प्रवेश सार्वजनिक धोरण उपक्रमांची निष्पत्ती आहे; यूनायटेड स्टेट्स मधील पुनर्वसन कायद्याच्या कलम 508 (फेडरल सरकारची इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञानाची खरेदी, विकास, देखरेख आणि वापर प्रशासित करणारा) आणि ETSI EN 301 549 (यूरोपियन प्रवेश मानक जे यूरोपियन कमिशन नियमांचे समर्थन करते ज्यामध्ये यूरोपमध्ये सार्वजनिक प्राप्तीसाठी आयसीटी उत्पादने आणि सेवांपर्यंत प्रवेशाचे निकष जोडलेले आहेत.)

## कोणती शहरे अशा अद्वितीय स्थितीत आहेत की त्यांच्या प्राप्तीच्या धोरणांमार्फत डिजिटल समावेशकाकडे जाऊ शकतात?



जगातील लोकसंख्या राहणारी शहरे वाढत आहेत. शहरात राहात असलेल्या अपंगत्व असलेल्या लोकांचे आणि वृद्ध व्यक्तींचे प्रमाण जलदरित्या वाढत आहे. 2050 पर्यंत, जगातील लोकसंख्येच्या 70% लोक शहरांमध्ये राहतील ज्यामध्ये अपंगत्व असलेले किमान 15% लोक असतील. जगाच्या दक्षिणेत स्थित असलेल्या दुय्यम आणि तृतीय शहरांमध्ये शहरी वाढ होत आहे आणि या विकसनशील देशांमध्ये अपंगत्व असलेले 80% लोक राहात आहेत. शहरीकरण आणि वृद्धत्वाचे कल देखील जवळपास जोडलेले आहेत. जगभरात, 2000 आणि 2015 दरम्यान 60 वर्षे आणि त्याहून जास्त वयाच्या लोकांची संख्या ग्रामीण भागातील फक्त 25 टक्के वाढीच्या तुलनेत शहरी भागात 68 टक्क्यांनी वाढली. हे लोकसंख्यात्मक कल शहरांना जागतिक अपंगत्व हक्कांचे केंद्र बनवतात. वास्तविक, सर्व जागतिक शहरांपैकी 84% हून अधिक अशा देशांमध्ये आहेत जे आधीच अपंग व्यक्तींच्या हक्कांच्या संदर्भात युनायटेड नेशन्स परिषदेचे (CRPD) भाग आहेत. 100 संवेदनक्षम शहरांमधील रॉकेफेलर फाऊंडेशन मधील प्रत्येकजण अशा देशांमध्ये आहेत ज्यांनी UN CRPD मंजूर केले आहे आणि/किंवा सही केले आहे.

शहरे ही जागतिक तंत्रज्ञान आघाड्यांपैकी देखील आहेत. 2015 मध्ये, जगातील 4 दशलक्ष शहरी निवास्यांपैकी 89% लोकांकडे 3जी मोबाइल ब्रॉडब्रँड कव्हरेज होते तर जगातील 3.4 दशलक्ष ग्रामीण लोकसंख्येपैकी केवळ 29% लोकांकडे 3जी मोबाइल ब्रॉडब्रँड कव्हरेज होते. शहरे ही जगाचे आर्थिक इंजिन असतात जी जागतिक जीडीपी तील 80% टक्के हिस्सा कमावतात. केवळ 20 मुख्य शहरांमध्ये जगातील मोठ्या कंपन्यांपैकी एक-तृतीयांश कंपन्या आहेत आणि त्या जागतिक जीडीपी तील 16% हिस्सा कमावतात. टॉपच्या बिझनेस हबमध्ये एकत्र झालेल्या फर्म्स जगभरातील सर्व मोठ्या कंपन्यांच्या एकत्रित महसूलाच्या 40 टक्के हून अधिक कमावतात.

जगभरातील लोकसांख्यिक कल आणि त्यांची जागतिक आघाडी मानवी हक्क, तंत्रज्ञान आणि आर्थिक उत्पादन यांसंबंधित आकडेवारी, शहरांना त्यांच्या जागतिक अपंगत्व हक्कांचे केंद्र म्हणून असलेल्या महत्त्वाच्या स्थितीचा फायदा घेण्याची संधी पुरवत असल्याचे दर्शविते. आयसीटी प्राप्ती धोरणांच्या मार्फत डिजिटल समावेशकता वाढविण्यास चालना देण्यासाठी शहरे या मार्गदर्शकातील साधने आणि तपाससूचींचा वापर करू शकतात.

2

# मॉडेल आयसीटी सार्वजनिक प्राप्ती धोरण

जगभरातील स्मार्ट सिटीज कार्यक्रम आघाडीच्या संस्था आणि जागतिक तज्ज्ञांनी विकसित केलेल्या विद्यमान मॉडेल प्राप्ती धोरणाचा फायदा घेऊ शकतील. ITU आणि G3ict मॉडेल आयसीटी प्रवेशक्षमता धोरण अहवाल हा सर्व सरकारी पातळींवरील धोरणकर्त्यांसाठी वास्तवातील मार्गदर्शक आहे.  मोड्यूल 6 विशेषत: आयसीटी प्रवेशक्षमता सार्वजनिक प्राप्ती धोरण चौकट सेट करते. मॉडेल धोरण राष्ट्रीय आणि इतर प्रशासकीय पातळ्यांसाठी डिझाइन केले होते आणि ते शहरे व स्थानिक अधिकारी यांच्यासाठी खूप उपयुक्त आहे. शहरे शहरी-पातळीवरील आयसीटी प्रवेशक्षमता प्राप्ती धोरण
विकसित करण्यासाठी धोरणाची भाषा स्वीकारू शकतात आणि एकरूप करू शकतात.

परंतु, मॉडेल प्राप्ती धोरण वापरताना शहरांसाठी, हे ओळखणे महत्त्वाचे असेल की त्यांच्या आयसीटी प्राप्ती प्रक्रियेचे स्वरूप काही महत्त्वाच्या बाबतीत राष्ट्रीय सरकारने स्वीकारलेल्यांहून वेगळे असू शकते. उदाहरणार्थ, शहर पातळीच्या सरकारसाठी, आयसीटी आणि तंत्रज्ञान विकत घेणे बऱ्याचदा वेगळे प्राप्ती उपक्रम म्हणून चालवले जात नाहीत. त्यामुळे, जेव्हा शहर तंत्रज्ञान घटक समाविष्ट असलेल्या पायाभूत सुविधा विकत घेते तेव्हा, ते बऱ्याचदा एकंदरीत टेंडर किंवा बाजाराप्रती दृष्टिकोन यांबरोबर एकत्रितपणे येऊ शकते. या बऱ्याचदा कठीण अशा प्राप्ती असतात जेथे आयसीटी हे अधिक मोठ्या अनेक वर्षांच्या, अनेक दशलक्ष डॉलर कंत्राटांचा गुंतलेला उपसंच असतो; बऱ्याचदा कठीण खरेदी आराखड्यांच्या अंतर्गत जिथे आयसीटी पुरवठादार हा प्रतिसादीचा उपकंत्राटदार असतो आणि जिथे शहराचे सरकार प्रत्यक्षात उपाययोजनेच्या निवडीसाठीची जबाबदारी सुपूर्द करते.

## मॉडेल धोरण म्हणजे काय?



ते जागतिक सर्वोत्तम पद्धतींशी सुसंगत असते आणि दोन पातळ्यांवर मार्गदर्शन पुरवते:

- राष्ट्रीय, प्रादेशिक किंवा संस्थात्मक पातळीवरील प्राप्ती धोरणे विकसित करण्यासाठी नियामक आणि धोरणकर्त्यांना उच्च स्तरीय धोरण मार्गदर्शन जे अर्थपूर्ण, मोजता येण्याजोग्या आणि वास्तविक मार्गापर्यंत प्रवेशक्षमता अंतर्भूत करते.
- प्राप्ती अधिकाऱ्यांना आणि प्रकल्प व्यवस्थापकांना त्यांच्या प्राप्तीच्या कामांमध्ये प्रवेशक्षमता अंतर्भूत करण्यास त्वरित सुरुवात कशी करायची यावर वास्तवातील सल्ला देते.

सार्वजनिक प्राप्ती एजन्सीजसाठी सर्व पातळ्यांवर प्रवेशक्षमता अनिवार्य असण्याची गरज स्पष्ट करून सांगते

- अपंगत्व असलेल्या लोकांच्या रोजगाराचा प्रसार करण्यासाठी आणि;
- आयसीटी प्रवेशक्षमता असलेली उत्पादने आणि सेवांसाठी बाजारपेठ तयार करण्यासाठी.

प्राप्तीच्या मुख्य टप्प्यांवर विचार करण्यासाठी ते एक नमूना भाषा पुरवते (टेंडरसाठी कॉल्स, आकारणी, निवड प्रक्रिया, मूल्यमापन आणि आढावा).

उत्पादन प्रवेशक्षमता टेंपलेटचा आणि कार्यात्मक कामगिरीच्या विधानांच्या संचाचा ते संदर्भ देते, जे आयसीटी प्रवेशक्षमता वैशिष्ठ्यांच्या श्रेणीस पारखण्यासाठी वापरता येऊ शकतात (यूनायटेड स्टेट्स कलम 508 किंवा ETSI EN 301 549 च्या विद्यमान प्रवेशक्षमता मानकांवर आधारित).

ते यासाठी वापरता येऊ शकतात:

- विद्यमान प्राप्ती धोरणांना प्रवेशक्षमता जोडणे
- विद्यमान धोरणांना पूरक म्हणून नगरपालिका आणि प्रादेशिक सहित विविध सरकारी पातळ्यांवर स्वतंत्र आयसीटी प्राप्ती धोरणे विकसित करणे
- संस्थात्मक पातळीवर आयसीटी प्रवेशक्षमता प्राप्ती धोरण विकसित किंवा अद्ययावत करणे.

## मॉडेल धोरणाच्या मुख्य भागांमध्ये यांचा समावेश आहे

- मुख्य तत्वे, संकल्पना आणि संज्ञा यांच्या व्याख्या (पृ.95 – 96)
- आयसीटी प्रवेशक्षमता प्राप्ती धोरणाचा हेतू आणि फायद्यांचा आढावा (पृ.96- 98)
- हेतू आणि तत्वे (पृ.98 – 99)
- भूमिका आणि जबाबदाऱ्या (पृ. 100)
- प्रशिक्षण, क्षमतेचा विकास आणि जाणीव वाढविणे (पृ.101 – 102)
- धोरणाच्या मुख्य ध्येयांचे वर्णन (पृ.101)
- तयारीच्या अभ्यासांपर्यंत प्रवेशक्षमतेसाठी तर्क (पृ. 102 – 103).
- प्राप्ती प्रक्रियेतील महत्त्वाचे टप्पे आणि उपक्रम - माहितीची विनंती करणे (पृ.103)
- प्रवेशक्षमता आवश्यकता निर्माण करण्यासाठी विद्यमान मानकांचा वापर करणे (पृ.104)
- आयसीटी प्राप्तीसाठी धोरणाचा आवाका (पृ. 104 – 105
- प्रवेशक्षमतांची मानके पूर्ण करण्यासाठी पुरवठादारांच्या क्षमतांचे मूल्यमापन करणे (पृ.105 – 106)
- कंत्राट अटी आणि कंत्राट व्यवस्थापन यांच्यासाठी शिफारसी (पृ. 107)
- देखरेख ठेवणे, सूट आणि धोरणाचा आढावा.

3

# आयसीटी स्वीकारण्यासाठी सात चरणे प्रवेशक्षमता प्राप्ती धोरण

अपंगत्व असलेल्या लोकांसाठी आणि वृद्ध व्यक्तींसाठी डिजिटल समावेशकतेच्या बांधिलकीसह स्मार्ट सिटीज आयसीटी प्रवेशक्षमता प्राप्ती धोरण स्वीकारण्यासाठी खालील सात चरणांचे अनुसरण करू शकतात.

अशी अपेक्षा आहे की कोणत्याही शहरात तंत्रज्ञानाच्या प्राप्ती संबंधित लोकांची भूमिका बदलत जाईल. प्राप्ती संचालक, आयटी व्यवस्थापक, सीआयओ किंवा अपंगत्व आयुक्त यांच्यासहित विविध भूमिकांमधील आघाड्यांवरील लोकांकडून त्यामुळे सात चरणांचे अनुसरण केले जाऊ शकते:

**चरण 1:** नेत्यांमध्ये जाणीव निर्माण करणे आणि संघटित करणे

**चरण 2:** विद्यमान आयसीटी आणि प्राप्ती धोरणांचा आढावा

**चरण 3:** आंतर्राष्ट्रीय आयसीटी प्रवेशक्षमता मानकाचा स्वीकार करणे आणि स्थानिक पातळीवर लागू करणे

**चरण 4:** आयसीटी प्रवेशक्षमता प्राप्ती धोरण स्वीकारण्यासाठी सार्वजनिक जाणीव आणि साहाय्य निर्माण करणे

**चरण 5:** शहर पातळीवरील प्राप्तीच्या मार्गदर्शक सूचना अंतर्भूत करण्यासाठी मॉडेल धोरण स्वीकारणे

**चरण 6:** शहराच्या एजन्सीजमध्ये अंमलबजावणी सक्रिय करणे

**चरण 7:** नवीन प्राप्ती धोरणाच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे आणि त्यावर देखरेख ठेवणे

## चरण 1:

## नेत्यांना संघटित करून जाणीव वाढविणे



☐ आयसीटी प्रवेशक्षमता प्राप्ती धोरण (उदा. मुख्य माहिती अधिकारी, अपंगत्व आयुक्त, मुख्य प्राप्ती अधिकारी इ.) सामाजिक करण्याची गरज आणि ते स्वीकारण्याचे फायदे यांसाठी शहरातील नेत्यांचा आणि प्रभावी व्यक्तींचा एक छोटा संघ तयार करा.

- सल्लामसलत प्रक्रियेत आणि नेत्यांच्या संघामध्ये उद्योगातील अपंगत्व असलेले लोक आणि इतर लोकांना समाविष्ट करा.
- त्या प्राप्ती अधिकाऱ्यांचा मूलभूत दृष्टिकोन माहीत करून घेण्याची खात्री करा जे टेंडर विकसित करतील, अनुरूपता विश्लेषणे करतील आणि उत्पादनाच्या प्रवेशक्षमतेची मूल्यमापने इ. करतील. हे अधिकारी यशस्वी प्राप्ती धोरणाचे डिझाइन आणि अंमलबजावणी करण्यासाठी महत्त्वाचे असतील.

☐ शहरी नेत्यांच्या छोट्या संघांमध्ये डिजिटल विभाजनाकडे लक्ष पुरविण्यासाठीच्या तर्कांसह आयसीटी प्रवेशक्षमता प्राप्ती धोरणाविषयी प्रशिक्षण आणि चर्चासत्रे आयोजित करून समजलेल्या गोष्टी शेअर करणे आणि सामायिक भाषा तयार करा.

- बाजारपेठेत उपलब्ध असलेल्या आयसीटी प्रवेशक्षमता पर्यायांतील काही महत्त्वाचे शोधण्यासाठी अपंगत्व संस्था आणि उद्योगांबरोबर चालू प्रशिक्षण आणि चर्चांचा वापर करा. बाजारपेठ पुरवठादारांना समाविष्ट करा.

☐ प्राप्ती धोरणाचा स्वीकार करण्यासाठी आणि पुढे जाण्यासाठी चरणांची योजना बनविण्यासाठी विविध पर्याय शोधा.

## चरण 2:

## विद्यमान आयसीटी आणि प्राप्ती धोरणांचा आढावा



☐

आपल्या शहरातील अस्तित्वात असलेले प्राप्ती नियम प्रवेशक्षमतेस किंवा समावेशकतेस संदर्भित करतात का आणि महत्त्वाच्या व्याख्या या सर्वोत्तम पद्धतीशी सुसंगत आहेत का हे तपासा.

- मॉडेल धोरणामध्ये संदर्भित केलेल्या व्याख्या पहा (विभाग 1).
- आपल्या शहराच्या प्राप्ती नियमांचा आणि नियमनांचा प्रवेशक्षमता जोडण्यासाठीची संधी म्हणून आणि सर्वोत्तम पद्धत म्हणून मॉडेल धोरणाशी सुसंगत करण्यासाठी नियमित आढावा आणि उजळणीचे चक्र घेतले जात आहे.

☐ समावेशक प्राप्ती धोरणे आधीच आवश्यक असू शकणारी विद्यमान कोणतीही राष्ट्रीय धोरणे किंवा बांधिलकी ओळखा.

- जगभरातील 170 हून अधिक देशांनी UNCRPD मंजूर केले आहे जे आयसीटी प्रवेश प्राप्ती धोरणांचा प्रसार करते. आपला देश या कराराचा भाग आहे का हे पाहण्यासाठी http://bit.ly/2kEM1C7 येथे जा.

- अतिरिक्त राष्ट्रीय आयसीटी प्रवेशक्षमता धोरणांमध्ये यांचा समावेश असू शकतो, उदाहरणार्थ, समावेशक शिक्षणासाठी धोरणे, दूरसंचार क्षेत्रासाठी आवश्यक धोरणे, प्रवेश करण्यायोग्य वेबसाइट्सची आवश्यकता, आर्थिक सेवा क्षेत्रात प्रवेशक्षमतांच्या आवश्यकता इ.
- तंत्रज्ञान आणि/किंवा अपंगत्व यांचे प्रभारी राष्ट्रीय मंडळ
  आपल्याला, अपंगत्वा-संबंधित विद्यमान राष्ट्रीय धोरणे पुरवू शकतात, ज्यांचा वापर आयसीटी प्रवेशक्षमता प्राप्ती धोरणाच्या अंमलबजावणी करण्याचे समर्थन करण्यासाठी करता येऊ शकतो.
  देशावर अवलंबून, या संस्था सरकारी किंवा सामाजिक क्षेत्रातील असू शकतात.

☐ आपल्या देशाची राष्ट्रीय सरकारी प्राप्ती धोरणे प्रवेशक्षमतेस संदर्भित करतात का हे तपासा.

- 2014 मध्ये, यूरोपियन यूनियनने त्यांचे प्राप्ती निर्देशांमध्ये (2014/24/EU) सुधारणा केली आणि यूरोप मधील सर्व सार्वजनिक मंडळांना प्राप्तींमधील प्रवेशक्षमतांच्या अधिक मजबूत आवश्यकता समाविष्ट केल्या.
- पुनर्वसन कायद्यातील कलम 508
  आयसीटी उत्पादने आणि सेवांच्या फेडरल सरकार खरेदीचा भाग म्हणून प्रवेशक्षमता आवश्यक करते. यूनायटेड स्टेट्स प्रवेश मंडळाने या आवश्यकता अद्यतनीत करण्यासाठी एक अंतिम नियम प्रकाशित केला आहे.
- ईयू आणि इतर 18 देशांच्या राष्ट्रीय प्राप्ती कायद्यांच्या आणि धोरणांच्या लिंक्स वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन गेटवे मार्फत येथे उपलब्ध आहेत https://e-gpa.wto.org/en/Agreement/Latest

☐ आपल्या राष्ट्रीय मानके मंडळाने ETSI EN 301 549, कलम 508, किंवा WCAG 2.0 यांसारखी आयसीटी प्राप्ती मानके स्वीकारली आहेत का हे तपासा.

- G3ict आणि ETSI दोन्हीही ETSI EN 301 549 मानक स्वीकारण्यासाठी मार्ग तयार करण्यात मदतगार असू शकतात.
- आपले राष्ट्रीय मानके मंडळ शोधण्यासाठी http://www.Iso.org/iso/home/about/iso_members.htm येथे जा.

☐ आयसीटी प्रवेशक्षमता प्राप्ती धोरणे स्वीकारलेली आहेत का हे इतर जवळपासच्या शहरांबरोबर तपासून पहा.

- 100 संवेदनक्षम शहरांमधील रॉकेफेलर फाऊंडेशन मधील शहरांपैकी बरीच अशा देशांमध्ये आहेत ज्यांनी CRPD मंजूर केले आहे आणि/किंवा सही केले आहे, ती कदाचित आयसीटी प्रवेशक्षमता प्राप्ती धोरणे स्वीकारतील.



## चरण 3:
## आंतर्राष्ट्रीय आयसीटी प्रवेशक्षमता मानक स्वीकारणे आणि स्थानिक पातळीवर लागू करणे

- ☐ सर्वांसाठी स्मार्ट सिटीजचा आढावा: प्राधान्याची आयसीटी प्रवेशक्षमता मानके साधन लागू करण्यासाठी मार्गदर्शक, जे तीन प्राधान्याची प्रवेशक्षमता मानके सूचीबद्ध करते

- ☐ थेट संदर्भित करण्यासाठी आंतर्राष्ट्रीय मानक निवडा.

  - मॉडेल धोरण अनेक कारणांकडे लक्ष वेधते जी जागतिक आयसीटी प्रवेशक्षमता मानकाने प्राप्ती धोरणामध्ये संदर्भित केली पाहिजेत. मॉडेल धोरण खालील मानकांकडे लक्ष वेधते जी सर्वांसाठी स्मार्ट सिटीज मधील तीन प्राधान्य मानकांच्या समान आहेत: प्राधान्याची आयसीटी प्रवेशक्षमता मानके साधन लागू करण्यासाठी मार्गदर्शक:
    - EN 301 549
    - पुनर्वसन कायदा कलम 508 (यूनायटेड स्टेट्स) तांत्रिक आवश्यकता
    - W3C WCAG 2.0 /ISO/IEC 40500 (2013) (कलम 9 पहा)

## चरण 4:
## आयसीटी प्रवेशक्षमता प्राप्ती धोरण स्वीकारण्यासाठी सार्वजनिक जाणीव आणि साहाय्य निर्माण करणे



- ☐ अपंगत्व आणि आयसीटी प्रवेशक्षमता यांविषयी सरकारी व्यवस्थापक आणि आयटी व्यवसायिकांसाठी मोठ्या प्रमाणात विशिष्ट प्रशिक्षण आणि क्षमता निर्माण करण्याचे उपक्रम चालवा. लोकांसाठी जाणीव कार्यक्रम आयोजित करण्याचा विचार करा.

  - स्पष्टपणे नेमून दिलेले प्रशिक्षण आणि क्षमता निर्माण करण्याचा दृष्टिकोन अपंगत्व असलेल्या लोकांची संख्या आणि त्यांच्या समावेशासाठी आयसीटी प्रवेशाचे महत्त्व यांबद्दलची जाणीव वाढविण्यास मदत करू शकतो.
  - अपंगत्व असलेल्या व्यक्तींना नियोजन आणि प्रशिक्षण सत्रे चालविण्यामध्ये समाविष्ट करा. हे UN CRPD मधील मूळ तत्वांशी सुसंगत आहे. या हेतूसाठी प्रवेशक्षमता चर्चांची योजना करण्यासंबंधीचे मार्गदर्शक एक उपयुक्त दस्तऐवज आहे.
  - मॉडेल धोरणातील विभाग 5.2 सुचवितो की विशिष्ट प्रशिक्षणातून अनेक गोष्टी जाणून घेता येतात जसे की "प्रवेशक्षमता म्हणजे काय", "अपंगत्व असलेल्या व्यक्ती आयसीटी कसे वापरू शकतात", "आयसीटी प्रवेशक्षमतेचा मुद्दा: सामाजिक आणि व्यावसायिक", "प्राप्ती प्रक्रियेत प्रवेशक्षमता कशा नमूद करायच्या आणि त्यांचे मूल्यमापन कसे करायचे" इ.)

- ☐ प्राप्तीच्या व्यासपीठासाठी नोंदणी केलेल्या व्यवसायांसहित उद्योग आणि भागधारकांच्या चर्चा आयोजित करा.

  - व्यवसाय आणि मानवी हक्क तर्कांना आयसीटी प्रवेशक्षमता प्राप्ती धोरणे स्वीकारणे स्पष्ट करून सांगण्यासाठी उद्योग आणि इतर भागधारकांच्या चर्चा आयोजित करा (मार्गदर्शकातील विभाग 7 पहा जो तर्क आणि व्यावसायिक गरजा स्पष्ट करून सांगतो).
  - आघाडीच्या कंपन्या देखील त्यांच्या स्वत:च्या पुरवठा साखळ्या आणि विक्रेत्यांबरोबरचे संबंध व्यवस्थापित करण्यासाठी प्राप्ती धोरणांचा स्वीकार करू लागल्या आहेत हे दाखवा.
  - राष्ट्रीय किंवा प्रादेशिक पातळीवरील अस्तित्वात असलेल्या अनिवार्य गोष्टींचा संदर्भ द्या जसे की अपंगत्व असलेल्या व्यक्तींसाठी कायदे, भेदभाव-विरोधी कायदे किंवा माहितीच्या कायद्यापर्यंत प्रवेश.

## चरण 5: शहर-पातळीवरील प्राप्तीच्या मार्गदर्शक सूचना अंतर्भूत करण्यासाठी मॉडेल धोरण स्वीकारणे

- ☐ नवीन धोरण तयार करणे, स्वीकारणे, लागू करणे आणि त्याचा आढावा घेणे यासाठी कालमर्यादा विकसित करा.
  - राष्ट्रीय सरकारसाठी डिझाइन केलेले मॉडेल धोरण, विशेषकरून शहराच्या संदर्भात लागू करण्यासाठी बदलले जाऊ शकते.
  - अपंगत्व असलेल्या लोकांचा आवाज हा या प्रक्रियेच्या केंद्रस्थानी असू शकतो.
- ☐ मॉडेल आयसीटी सार्वजनिक प्राप्ती धोरणाच्या महत्त्वाच्या विभागांचा आढावा घ्या आणि व्याख्या सुसंगत करा.
- ☐ शहर-पातळीवरील धोरणाची उद्दिष्ट्ये तयार करा आणि विस्तृत तत्वे मान्य करा.
  - सहा तत्वे जी मॉडेल धोरण अंमलात आणतात: भेदभाव रहित, समावेशकता, प्रवेशक्षमता, पारदर्शकता, किफायतशीर आणि पैशाचे मूल्य देणारे (मॉडेल धोरण विभाग 3.2 पहा)
- ☐ शहर-पातळीवरील आयसीटी प्रवेशक्षमता प्राप्ती धोरण विकसित आणि लागू करण्यासाठी भूमिका आणि जबाबदाऱ्या कशा नेमल्या जातील याचा विचार करा.
  - मॉडेल धोरणातील विभाग 4 पहा आणि आयसीटी प्रवेशक्षमता सार्वजनिक प्राप्ती धोरणामध्ये कर्मचारी, परिषदा आणि समित्यांच्या महत्त्वाच्या भूमिका आखून द्या.
- ☐ जागतिक मानकांच्या आधारावर कार्यात्मक कामगिरी विधानांचा आढावा घ्या आणि विचार करा.
  - प्राप्ती धोरणाचा महत्त्वाचा भाग हा वापरलेली तांत्रिक मानके असेल (मॉडेल धोरणामधील विभाग 6 पहा आणि जोडपत्र अ मधील कार्यात्मक कामगिरी विधानांचा संच पहा). विधाने थेट संदर्भित केली जाऊ शकतात [उदा. दृष्टीशिवाय वापर (2.1) 'मर्यादित दृष्टीसह' (2.2), 'रंगाच्या आकलनाशिवाय' (2.3)] कारण त्यांचा विभाग 508 आणि ETSI EN 301 549 मध्ये सेट केलेल्या विधानांशी मिलाफ करण्याच्या उद्देश असतो. सर्वांसाठी स्मार्ट सिटीज देखील पहा: प्राधान्याची आयसीटी प्रवेशक्षमता मानके साधन लागू करण्यासाठी मार्गदर्शक:



☐ कंत्राट टेंपलेट्सचा आढावा घ्या आणि कंत्राटांमधील प्रवेशक्षमता नमूद करा.

- जागतिक मानकांना संदर्भित करून किंवा शहराचे आयसीटी प्रवेशक्षमता प्राप्ती धोरण विकसित होत जाईल तसतसे, प्रवेशक्षमतांच्या आवश्यकता एक मानक म्हणून समाविष्ट कशा करता येतील हे पाहण्यासाठी विद्यमान कंत्राट टेंपलेट्सचा आढावा घ्या आणि ती प्राप्ती व कायदा अधिकाऱ्यांशी जुळवून घ्या (विभाग 13 पहा).

☐ सध्याच्या अनुरूपतेचे मूल्यमापन करण्याच्या क्षमतेसह, भावी विक्रेत्यांकडून माहिती गोळा करण्याच्या आणि मूल्यमापन करण्याच्या दृष्टिकोनांचा आढावा घ्या.

- उत्पादन पातळीवर - प्राधान्याने वापराच्या संदर्भा अंतर्गत
- उपाययोजना पातळीवर - म्हणजे अंमलबजावणी पातळीवर एकत्र काम करताना सर्व घटक भाग विकसित आणि संरचित झाल्यावर प्रवेशक्षमता मानकांना
- कसे समर्थन दिले जाईल: म्हणजे जेव्हा विद्यमान "आहे तशा" वातावरणामध्ये उपाययोजना सामावून घेतली जाते तेव्हा प्रवेशक्षमता मानकांना कसे समर्थन दिले जाईल

☐ मॉडेल धोरणामध्ये सेट केलेल्या पाच प्राप्ती चरणांमध्ये आपली विद्यमान प्राप्ती प्रक्रिया आखा. गुंतलेल्या आयसीटी प्राप्तीसारख्या काही महत्त्वाच्या मार्गांनी फटी आणि सुसंगत करण्याची क्षेत्रे ओळखा, शहर पातळीवरील प्रक्रिया ही सरकारी राष्ट्रीय पातळीवरील प्रक्रियेपेक्षा वेगळी असू शकते.

☐ प्राप्ती प्रक्रियेतील पाच चरणांमध्ये उपक्रमांच्या श्रेणीसाठी विशिष्ट प्रतिसाद कालमर्यादा विकसित करण्याचा विचार करा, उदा. मंजूरी तयार करण्याचा कालावधी, सूटीवर प्रक्रिया करण्याचा कालावधी इ.

## प्राप्तीची पाच चरणे

**1. तयारीचा अभ्यास** - प्राप्ती अधिकारी आवश्यक उत्पादने किंवा सेवा पुरविण्यासाठी बाजारपेठेची (विक्रेत्यांची) क्षमता शोधून काढतो. प्राप्ती करण्याच्या आयसीटी उपाययोजनेसाठी संस्थात्मक आणि वापरकर्त्यांच्या गरजा स्थापित करणे.

**2. टेंडर मागविण्यासाठी लिहिणे** - प्राप्ती अधिकारी आवश्यक उत्पादन किंवा सेवा आणि प्राप्ती पद्धतीच्या अटी यांचे नेमके तपशील लिहितात आणि संभाव्य विक्रेत्यांना पाठवतात. या टप्प्यादरम्यान, प्राप्ती अधिकारी प्रवेशक्षमता निकषाशी अनुरूपता असल्याचे दर्शविणाऱ्या पुराव्याची विनंती करतात.

**3. टेंडर्सचे मूल्यमापन करणे** - प्राप्ती अधिकारी टेंडर मागविण्यामध्ये स्थापित केलेल्या निकषानुसार प्रत्येक विक्रेत्याच्या प्रतिसादाचे मूल्यमापन करतात. मूल्यमापनांमध्ये अनुपालन स्व-घोषणा, सहाय्यक पुराव्यासह स्व-घोषणा,
तृतीय पक्षाच्या मूल्यमापन प्रमाणपत्रांसह स्व-घोषणा इ. चा समावेश असू शकतो. उदाहरणार्थ, यूनायटेड स्टेट्स मध्ये, ऐच्छिक उत्पादन प्रवेशक्षमता टेंपलेट्स (VPAT) आहेत जिथे विक्रेते प्रवेशक्षमतांच्या आवश्यकता ते पूर्ण करीत असल्याचे दर्शवितात (विभाग 8 पहा).

**4. वितरण केल्या जाणाऱ्या गोष्टींचे मूल्यमापन करणे** - प्राप्ती अधिकाऱ्यांनी ही खात्री करून घेतली पाहिजे की वितरण केल्या जाणाऱ्या गोष्टी टेंडरमध्ये स्थापित केलेल्या निकषांची पूर्तता करतात. यामध्ये उदाहरणार्थ, अपंगत्व असलेल्या लोकांकडून वापरकर्ता चाचणीचा समावेश असू शकतो.

**5. कंत्राटांचे व्यवस्थापन करणे** - कंत्राट व्यवस्थापनामध्ये प्रवेशक्षमता कशी स्वीकारता येते याची व्याख्या करतात. यामध्ये अपवाद हाताळण्याची प्रक्रिया आणि विक्रेते व वापरकर्ते दोन्हींकडून प्रतिसाद मिळविणे समाविष्ट असू शकते. आयसीटी सेवांच्या प्राप्तीसाठी हे विशेषत: सुसंगत आहे.

## चरण 6:
## शहराच्या एजन्सीजमध्ये अंमलबजावणी सक्रिय करणे



- ☐ सध्याच्या प्रवेशक्षमता प्रशिक्षण प्रस्तावांचे मूल्यमापन करा. प्रशिक्षण प्रस्तावांमधील गहाळ गोष्टी ओळखा आणि त्यांना प्राधान्य द्या.
- ☐ प्रशिक्षण कोणाला प्राप्त झाले पाहिजे याची व्याख्या करण्यासाठी प्रवेशक्षमता प्रशिक्षण योजना विकसित करा. नवीन प्रशिक्षण कधी आणि कसे उपलब्ध होईल हे ओळखा.
- ☐ लोकांच्या आणि सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या वापरासाठी प्रशिक्षण तयार करा आणि सुपूर्त करा, क्षमता निर्माण करा आणि या धोरणाची जाणीव वाढवा. मूलभूत गरजांकडे लक्ष पुरविण्यासाठी प्रवेशक्षमता प्रशिक्षण संसाधने विकसित करा / मिळवा / पुरवा. फूट भरून काढण्यासाठी शक्य असेल तेथे इतर शहरांनी आणि सरकारांनी विकसित केलेल्या आणि वापरलेल्या प्रशिक्षण संसाधनांचा वापर करा. प्रशिक्षण कॅलेंडर विकसित करा आणि छापा आणि एजन्सी व्यवस्थापन आणि कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाचे प्रस्ताव कळवा.
- ☐ प्रशिक्षकास प्रशिक्षण आवश्यक असेल तेथे प्रमाणता वाढविण्यासाठी "प्रशिक्षकाला प्रशिक्षित करा" या पर्यायांचा पाठलाग करा.
- ☐ प्रशिक्षण घेणाऱ्या कर्मचाऱ्यांचा मागोवा घ्या.
- ☐ परिणामकारकता मोजण्यासाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाबाबत अभिप्राय देण्याची विनंती करा.

## चरण 7:
## नवीन प्राप्ती धोरणाच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे आणि त्यावर देखरेख ठेवणे



- ☐ धोरणावर नियमित देखरेख ठेवण्यासाठी एक प्रक्रिया तयार करा (दर 2 वर्षातून किमान एकदा)
  - अंमलबजावणी वर देखरेख ठेवण्यासाठी व आढावा घेण्यासाठी आणि धोरणात आवश्यक बदल करण्यासाठी अंदाजपत्रक बनवा. अपंगत्व असलेल्या व्यक्तींना देखरेख आणि आढाव्यामध्ये सामील करा उदा. अंतिम-वापरकर्ते, शहर कर्मचारी आणि नागरिक.
- ☐ इतर स्मार्ट शहरांच्या आणि CRPD देखरेख प्रक्रियेतील यशस्वी गोष्टी शेअर करा.
  - नावीन्यपूर्ण गोष्टी आणि CRPD समितीसह प्रगती शेअर करण्यामुळे आपल्या देशाच्या अहवाल बनविण्यास समर्थन मिळेल आणि आपल्या अनुभवातून इतर शहरांना शिकण्याचा मार्ग मिळेल. प्रवेशयोग्य प्राप्ती गुंतवणूकींमुळे अधिक चांगल्या नावीन्यपूर्ण गोष्टी कशा सध्या होऊ शकतात याची ओळख करून देण्यासाठी आयसीटी प्रवेशक्षमतेमधील नावीन्यपूर्ण गोष्टींसाठी पारितोषिक देण्याचा विचार करा.

4

# निष्कर्ष

प्राप्ती हे सरकारकडे उपलब्ध असणाऱ्या सर्वात महत्त्वाचे आणि परिणामकारक धोरण साधनांपैकी एक आहे. प्राप्ती धोरणांचा विविध क्षेत्रांवर मोठा परिणाम असतो ज्यामध्ये बाजारपेठांची, वैयक्तिक कंपन्यांची वागणूक आणि नागरिकांचे जगणे समाविष्ट असते. हे अपंगत्व असलेल्या व्यक्तींसाठी आणि वृद्ध व्यक्तींसाठी विशेषत: खरे असते, जे ते राहू इच्छित असलेल्या शहरी वातावरणांच्या प्रकारासंबंधित घेतलेल्या निर्णयांमध्ये आणि ते त्यापर्यंत कसा प्रवेश करून त्याचा उपयोग करू शकतात, यांमध्ये त्यांना समाविष्ट करून घेण्यासाठी आणि धोरण कर्त्यांवर अवलंबून असतात.

सरकारे ही आयसीटी ची सर्वात मोठ्या खरेदीदारांपैकी असल्यामुळे, आयसीटी प्रवेशक्षमता स्मार्ट सिटी कार्यक्रमांमध्ये आणि उपाययोजनांमध्ये अंतर्भूत असल्याची खात्री करण्यासाठी प्राप्ती विशेषत: महत्त्वाची आहे.

संपूर्णपणे नवीन धोरणे तयार करण्याच्या लांबणाऱ्या विकास प्रक्रियांमधून जाण्याची गरज काढून टाकून, शहरांच्या द्वारे आधीपासून अस्तित्वात असलेली राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय धोरणे थेट स्वीकारली जाऊ शकतात. त्याऐवजी, विद्यमान राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय धोरणे या मार्गदर्शकात पुरविलेल्या 7 चरणी तपाससूचीसह, वैयक्तिक शहरांशी परिणामकारक रीतीने जुळवून घेण्यासाठी अनुकूल केली जाऊ शकतात. तपाससूचीमध्ये अधोरेखित केलेल्या चरणांची अंमलबजावणी करून, स्मार्ट सिटीचे नेते आयसीटी प्रवेशक्षमतेच्या महत्त्वाबद्दल त्यांच्या कर्मचाऱ्यांमध्ये आणि सामान्य लोकांमध्ये जाणीव निर्माण करू शकतात आणि सर्वांच्या डिजिटल समावेशास साहाय्य करण्यासाठी धोरणे स्थापित केली असल्याची खात्री करू शकतात.

## G3ict

समावेशक माहिती आणि संवाद तंत्रज्ञांनांसाठीचा जागतिक उपक्रम हा एक समर्थनार्थ उपक्रम आहे जो डिसेंबर 2006 मध्ये यूनायटेड नेशन्स ग्लोबल अलायन्स फॉर आयसीटी अँड डेवलपमेंट यांनी, UN DESA येथे सेक्रेटेरिएट फॉर द कन्वेंशन ऑन द राइट्स ऑफ पर्सन्स विथ डिसेबिलिटिज यांच्या सहकार्याने सुरू केला. कन्वेंशन ऑन द राइट्स ऑफ पर्सन्स विथ डिसेबिलिटिज (CRPD) प्रसार करीत असलेल्या डिजिटल प्रवेशक्षमता आणि सहाय्यक तंत्रज्ञाने यांच्या मांडणीच्या अंमलबजावणीस सुलभ करणे आणि साहाय्य करणे हे त्यांचे ध्येय आहे. अधिक माहिती http://g3ict.org/ येथे सापडू शकते.

## वर्ल्ड एनेबल्ड

वर्ल्ड एनेबल्ड हा एक जागतिक शिक्षण, संवाद आणि धोरणात्मक सल्ला देणारा गट आहे. अपंगत्व असलेल्या व्यक्तींच्या हक्कांना प्रोत्साहन देणाऱ्या कायद्याने अनिवार्य गोष्टींच्या संपूर्ण अंमलबजावणीमध्ये आम्ही कंपन्या आणि सरकारांना साहाय्य करतो. आमचे काम आणि संशोधनातील उपक्रम शहरी नियोजन आणि समावेशक शहरी विकास यांवर केंद्रित असतो. आमच्या आंतरराष्ट्रीय भागीदारांसह, आम्ही समावेशक समाज निर्माण करतो जेथे अपंगत्व असलेल्या व्यक्तींना त्यांचे कर्तृत्व पूर्णपणे विकसित करतात आणि त्यांच्या पूर्ण क्षमतांचा वापर करतात. अधिक माहिती येथे सापडू शकते
http://worldenabled.org/

# टीम बायोस

G3ict चे उपाध्यक्ष जेम्स थर्स्टन आणि वर्ल्ड एनेबल्ड चे अध्यक्ष डॉ. व्हिक्टर पिनेडा यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम चालवला जातो. जेम्स आणि व्हिक्टर दोघेही आघाडीचे जागतिक तज्ञ आहेत आणि अपंगत्व असलेल्या व्यक्तींना इतर लोकांच्या बरोबरीने स्मार्ट सिटीजच्या अद्भुत प्रगतीचा आनंद घेता यावा याची खात्री करण्यासाठी एक व्यापक युती निर्माण करण्यासाठी बांधील आहेत.



डॉ. व्हिक्टर पिनेडा हे वर्ल्ड एनेबल्ड चे अध्यक्ष आहेत. ते ग्लोबल अलायन्स ऑन ॲक्सेसिबल टेक्नॉलॉजीज आणि एनव्हायर्नमेंट्स (GAATES) चे अध्यक्ष म्हणूनही काम पाहतात. डॉ. पिनेडा हे आंतरराष्ट्रीय अपंगत्व हक्कांचे सुप्रसिद्ध नेते आहेत आणि यूएस चे अध्यक्ष बराक ओबामा यांनी त्यांची आर्किटेक्चरल अँड ट्रान्सपोर्टेशन बॅरियर्स कंप्लायन्स बोर्ड वर नेमणूक केली होती. ते यूनिवर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, बेर्केले मध्ये शहर नियोजन शिकवतात. डॉ. पिनेडा यांना अनेक पारितोषिके प्राप्त झाली आहेत ज्यामध्ये नॅशनल सायन्स फाऊंडेशन (NSF) इनोव्हेशन रिसर्च ग्रांट, फुलब्राइट-हेज स्कॉलरशिप आणि एएपीडी पॉल जी. हेयर्न लीडरशिप ॲवॉर्ड यांचा समावेश आहे. डॉ. पिनेडा यांनी कॅलिफोर्निया यूनिवर्सिटी, बेर्केले मधून बी.ए., बी.एस. आणि एम.सी.पी. पूर्ण केले आणि कॅलिफोर्निया यूनिवर्सिटी, लॉस एंजिल्स मधून पीएच.डी. पूर्ण केले.



जेम्स थर्स्टन हे आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजलेले तंत्रज्ञान धोरणाचे नेते आहेत. G3ict चे उपाध्यक्ष म्हणून जागतिक धोरण आणि विकासासाठी, त्यांनी G3ict चा जागतिक ठसा वाढविण्यासाठी नवीन कार्यक्रमांच्या डिझाइनचे आणि अंमलबजावणीचे नेतृत्व केले. त्यांनी यूएस आणि परदेशातील उच्चस्तरीय सरकारी नेत्यांसाठी तंत्रज्ञान धोरण, मानवी हक्क आणि डिजिटल समावेशकता यांविषयीचे सल्लागार म्हणून काम केले आहे. त्यांना महत्त्वाच्या सामाजिक आणि आर्थिक आव्हानांसाठी तंत्रज्ञान आणि सार्वजनिक धोरण दोन्ही लागू करण्याचा अनुभव आहे. त्यांना फेडरल, राज्य आणि आंतरराष्ट्रीय पातळयांवरील सरकारसाठी खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील धोरण आणि व्यवस्थापनाचा विस्तृत अनुभव आहे. G3ict शी जोडले जाण्यापूर्वी, श्री. थर्स्टन हे मायक्रोसॉफ्ट मध्ये आंतरराष्ट्रीय प्रवेशक्षमता धोरणाचे संचालक होते, जेथे त्यांनी अपंगत्व आणि तंत्रज्ञान समस्यांमध्ये कंपनीची पोहोच वाढविण्यासाठी एक जागतिक धोरण विकसित केले आणि अंमलात आणले. श्री. थर्स्टन यांनी वॉशिंग्टन यूनिवर्सिटी मधून मास्टर ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन आणि ईस्ट यूरोपियन अभ्यासांमधील एम.ए. दोन्ही पूर्ण केले आहे तसेच माईने यूनिवर्सिटी मधून आंतरराष्ट्रीय मुद्द्यांमध्ये बी.ए. पूर्ण केले आहे.

# सर्व संसाधनांसाठी स्मार्ट सिटीज

www.**smartcities4all**.org येथे भेट देऊन अतिरिक्त साधने डाऊनलोड करा.

संपर्क: info@**smartcities4all**.org